सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाचा प्रधानमंत्री मातृवंदना योजना या केंद्र पुरस्कृत योजनेचा लवचिक निधी व प्रशासकीय खर्चासाठी केंद्र व राज्य हिश्याचा (६०:४०) निधी वितरित करण्याबाबत .

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## शासन निर्णय क्रमांकः पुरमा -२०१८/प्र.क्र.५८५/कु.क.

१० वा मजला, बी विंग, गो.ते.रुग्णालय संकुल इमारत
नवीन मंत्रालय, लो.टि.मार्ग, मुंबई ४०० ००१
तारीखः २९ मार्च,२०१९

**वाचा -**

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांकः अर्थसं२०१८/प्र.क्र.१२४/अर्थसंकल्प, दि.०६.१२.२०१८
२) केंद्र शासनाचे पत्र क्र.१५/२८/२०१७/PMMVY, दिनांक २९ डिसेंबर,२०१७

**प्रस्तावना -**

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाचा प्रधानमंत्री मातृवंदना योजनेसाठी लवचिक निधी व प्रशासकिय खर्चासाठी प्राप्त झालेला केंद्र शासनाचा निधी (६०% ) हिस्सा रु. १२७०.४४ लक्ष व राज्य शासनाचा निधी (४०%) हिस्सा रु. ८४७.०० लक्ष असा एकूण रु.२११७.४४ लक्ष (रुपये एकवीस कोटी सतरा लाक्ष चव्वेचाळीस हजार फक्त) एवढा निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय -

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षासाठी प्रधानमंत्री मातृवंदना योजनेकरीता केंद्र शासनाने लवचिक निधी व प्रशासकिय खर्चापोटी रु. १२७०.४४ (रुपये बारा कोटी सत्तर लक्ष चव्वेचाळीस हजार फक्त) एवढा निधी राज्यास उपलब्ध करुन दिला आहे. त्यानुषंगाने राज्य हिश्याचा ४०% नुसार रु.७०८.०० (रुपये सात कोटी आठ लक्ष फक्त) एवढा निधी संबंधीत यंत्रणेस द्यावयाचा असल्याने केंद्र व राज्य हिश्याचा असा एकूण रु.२११७.४४ (रुपये एकवीस कोटी सतरा लक्ष चव्वेचाळीस हजार फक्त) एवढा निधी सन २०१८ च्या हिवाळी अधिवेशनात पुरक मागणीद्वारे मंजुर करुन घेण्यात आला आहे. सदर निधी वितरित करण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजुरी देण्यात येत आहे.

२. उपरोक्त निधीसाठी मुख्य प्रशासकीय अधिकारी, अतिरिक्त संचालक, कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून आणि अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माता बाल संगोपन आणि शालेय आरोग्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. पुरक-२०१८/ प्र.क्र.१३५/अर्थ-३,दि.५.१२.२०१८ मधील तरतुदीनुसार सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात खालील लेखाशीर्षाखाली एकूण रु.२११७.४४ लक्ष (रुपये एकवीस कोटी सतरा लक्ष चव्वेचाळीस हजार फक्त) एवढा निधी खर्च करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

(रु. लाखात)

| अ.क्र. | तपशील | केंद्र शासनाने मंजूर केलेला निधी (केंद्र हिस्सा- ६०%) | केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाच्या अनुरुप राज्य हिश्याचा ४०% नुसार द्यावयाचा निधी | सन-२०१८ च्या हिवाळी अधिवेशनात पुरक मागणीद्वारे उपलब्ध झालेले अनुदान | वितरित करावयाचा केंद्र व राज्य हिस्सा (६०:४०) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | मागणी क्र. आर-१, २२११ कुटुंब कल्याण, ००-१०३ माता व बाल आरोग्य, ०२ प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व सहयोग कार्यक्रम, (०२) (०२) प्रधानमंत्री मातृवंदना योजना (लवचिक निधी) (केंद्र पुरस्कृत योजना) **(केंद्र हिस्सा ६०%) २२११ १३९७,** ५० इतर खर्च | १०६२.०० | ०.०० | १०६२.०० | १०६२.०० |
| २ | मागणी क्र. आर-१, २२११ कुटुंब कल्याण, ००-१०३ माता व बाल आरोग्य, ०२ प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व सहयोग कार्यक्रम, (०२) (०३) प्रधानमंत्री मातृवंदना योजना (लवचिक निधी) (केंद्र पुरस्कृत योजना) **(राज्य हिस्सा ४०%) २२११ १४०३,** ५० इतर खर्च | ०.०० | ७०८.०० | ७०८.०० | ७०८.०० |
| ३ | मागणी क्र. आर-१, २२११ कुटुंब कल्याण, ००-१०३ माता व बाल आरोग्य, ०२ प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व सहयोग कार्यक्रम, (०२) (०४) प्रधानमंत्री मातृवंदना योजना (प्रशासकिय खर्च) (केंद्र पुरस्कृत योजना) **(केंद्र हिस्सा ६०%) २२११ १४१२,** २० इतर प्रशासकिय खर्च | २०८.४४ | ०.०० | २०८.४४ | २०८.४४ |
| ४ | मागणी क्र. आर-१, २२११ कुटुंब कल्याण, ००-१०३ माता व बाल आरोग्य, ०२ प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व सहयोग कार्यक्रम, (०२) (०५) प्रधानमंत्री मातृवंदना योजना (प्रशासकीय खर्च) (केंद्र पुरस्कृत योजना) **(राज्य हिस्सा ४०%) २२११ १४२१,** २० इतर प्रशासकिय खर्च | ०.०० | १३९.०० | १३९.०० | १३९.०० |
| **एकुण** | | **१२७०.४४** | **८४८.००** | **२११७.४४** | **२११७.४४** |

४. सदर शासन निर्णयान्वये वितरित केलेल्या निधीबाबतचे देयक कोषागारात सादर करुन विहित केलेल्या बाबीवर खर्च करण्यासाठी राज्य आरोग्य सोसायटी- PMMVY यांच्याकडे निधी सुपूर्द करण्यात यावा.

५. या शासन निर्णयान्वये योजनेसाठी वितरित केलेल्या निधीतून योजनेच्या प्रशासकीय खर्चाचे विहीत नमुन्यातील उपयोगिता प्रमाणपत्र व योजनेच्या प्रगतीचा अहवाल केंद्र व राज्य शासनास विहित प्रपत्रात केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वेळोवेळी पाठविण्याता यावा. प्रधानमंत्री मातृ वंदना या केंद्र पुरस्कृत योजनेच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी प्राप्त झालेल्या अनुदानापेक्षा अधिक खर्च होणार नाही याची संबंधित अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दि.२.४.२०१८ मधील परिच्छेद क्र. ६ च्या तरतुदीस अनुसरुन तसेच नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ७२/२०१९/कार्या१४६१, दि.१६.३.२०१९ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ १२६/२०१९/व्यय-१३, दि.२३.३.२०१९ अन्वये प्राप्त सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२९११५७११६६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ujwala Arun Ransing

Digitally signed by Ujwala Arun Ransing
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7788b3b31e2d9269bcbfd9588a6ee4771341780133d295a56dd4ef476977773, serialNumber=3b8f98f1c182bf458a4deee399a7241b5044aeb09c097bc6d28b58709fe8ef0d, cn=Ujwala Arun Ransing
Date: 2019.03.29 12:55:56 +05'30'

**(उज्वला अ. रणसिंग)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर
२. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
३. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
४. आयुक्त आरोग्य सेवा, तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
५. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
६. सह संचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
७. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
८. वित्त विभाग (व्यय-१३/अर्थसंकल्प-९), मंत्रालय, मुंबई.
९. सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प/लेखा), मंत्रालय, मुंबई.
१०. निवडनस्ती